भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये

Rs. 100

रु. 100

ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2015 ◑ NP 138089

अनु.क्र. 13058 दि. 12 FEB 2016 मुल्य 100

१) दस्ताचा प्रकार : हमीपत्र

२) दस्त नोंदणी करणार आहेत का ?:- होय/नाही

३) मिळकतीचे वर्णन :

४) मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नांव :

५) पत्ता :

६) हस्ते व्यक्तीचे नांव :

७) पत्ता :

८) दुसऱ्या पक्षकाराचे नांव :

मुद्रांक घेणाऱ्याची सही

विजय बबनराव भालेकर
परवाना क्र. २२०१०२७
७५/५१०, महर्षीनगर, पुणे-३७.

12 FEB 2016

NOTARY ★ PRAMOD C. SHARMA ★ PUNE ★ REGD. No. 907 ★ GOVERNMENT OF INDIA

हमीपत्र

आज दिनांक १२ /२/२०१६ रोजी पुणे येथे

मी श्री. मुकेश मदनलाल छाजेड , वय: ४२ वर्षे, धंदा:- व्यवसाय, राहणार:- ९९८, शुक्रवार पेठ, पुणे -४११००२ सत्यप्रतिज्ञेवर असे हमीपत्र करुन देतो की, मौजे - माले, ता. मुळशी, जि. पुणे येथील गट नं. ४३८ पैकी १०१०० चौ. मी. (१ हे. ०१ आर) या जागेचे मालक असून आपल्या कार्यालयात वनघर परवानगीसाठी प्रस्ताव सादर केला आहे. सदरचे जागेस ग्रामपंचायत कार्यालयाकडून पाणीपुरवठा उपलब्ध होऊ शकणार नाही याची आम्हाला जाणीव आहे.

तुर्त या जागी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पुणे कडून पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध होऊ शकत नाही याची माहिती आम्हाला देण्यात आली असून याला पर्याय म्हणून जागेवरील बोअरव्दारा पाणी उपलब्ध करुन देण्याची किंवा टँकरव्दारे पाणी मिळण्याची व्यवस्था करीत आहोत व त्यासंबंधी आवश्यक त्या वरिष्ठ भू वैज्ञानिक अधिकारी भुजल सर्वेक्षण आणि विकास योजना (G.W.S. & D.A.) या कार्यालयामार्फत किंवा तत्सम तांत्रिक सल्लागारामार्फत सदर जागी पाणी असल्याबद्दलचे प्रमाणपत्र आणून देण्याची कार्यवाही करणे आमचेवर बंधनकारक राहील.

इमारत पूर्ण झाल्यावर इमारतींमधील निवासी बिगरनिवासी वापरासाठी पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे पिण्यासाठी पुरेश्या दाबाने करु शकत नसल्यास पाण्याची पर्यायी व्यवस्था प्रवर्तक या नात्याने इमारतीमधील रहिवाशांना आम्ही करुन देण्यास तयार असून त्याची सर्व जबाबदारी आम्ही या हमीपत्राव्दारे स्विकारत आहे.

पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे मार्फत कोणताही पाणीपुरवठा सुरु न झाल्यास किंवा अपुरा झाल्यास आम्ही कोणत्याही कोर्टाकडे याबाबतीत दावा दाखल करणार नाही.

निवासी अगर व्यापारी गाळ्यांचे विक्रीचे बुकिंग करताना येणाऱ्या करारनाम्यामध्ये पाणी पुरवठ्याची वरीलप्रमाणे सर्व वस्तुस्थितीची जाणीव ही नियोजित गाळे धारकांना करुन दिल्यानंतर सुध्दा याठिकाणी होणाऱ्या बुकिंगनंतर नियोजित गाळे धारकांना पाणी पुरवठा अपुरा झाला तर पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे चा पुरेसा

पाणीपुरवठा सुरु होईपर्यंत आमच्या खर्चाने पुढचा पाणीपुरवठा करुन देण्याची आमची जबाबदारी राहील. पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे ला तोषिस लागू देणार नाही.

टँकरव्दारा किंवा बोअरव्दारा सध्या मिळणाऱ्या पाण्याचे नमुने वेळोवेळी प्रयोगशाळेतून तपासून आणणे व त्यारिपोर्ट नुसार पाणी योग्य आढळल्यास पाणी वापरण्यात येईल, याची आम्ही काळजी घेऊ.

सदरची योजना संपुर्णरित्या मालक या नात्याने आमचे अन्य कोणास भविष्यकाळात विकल्यास नविन मालक प्रवर्तकास या हमीपत्रातील सर्व बाबींची लेखी कल्पना देईन त्याचा समावेश नविन करारनाम्यात करण्यात येईल याची काळजी घेऊ.

हे हमीपत्र आमचे वालीवारसावर बंधनकारक राहील. सदर प्लॉटमध्ये संदर्भातील कोणत्याही करारामध्ये या हमीपत्राचा समावेश करण्यात येईल व हे हमीपत्र करारनाम्यातील विशेष बाब म्हणून समजण्यात येईल.

वरील हमीपत्र आम्ही राजीखुशीने दि. १२/०२/२०१६ रोजी लिहून दिले आहे.

दिनांक - १२ /२/२०१६

पुणे

NOTARY PRAMOD C. SHARMA PUNE REGD. No. 907 GOVERNMENT OF INDIA

हमीपत्र करणारास मी व्यक्तीशः ओळखतो

NOTARIAL FIVE RUPEES

हमीपत्र करणार

श्री. मुकेश मदनलाल छाजेड

12 FEB 2016

BEFORE ME

PRAMOD C. SHARMA
NOTARY, GOVERNMENT OF INDIA
PUNE

Noted and Registered
At Sr. No. 1312
Date 12 FEB 2016